I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 185-187

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# वस्तू व सेवा कराचा शेतकरी वर्गावर होणारा परिणाम

डॉ.राजेश पी.कांबळे

सहाय्यक प्राध्यापक

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

Communicated : 28.03.2022 | Revision : 02.04.2022 Accepted : 08.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

भारताला कधी काळी सोन्याचा धूर निघणारा देश म्हटले जायचे. आजही भारत देश हा शेतीप्रधान देश आहे. पूर्वी या देशात एक म्हण फार प्रचलित होती. 'उत्तम शेती,मध्यम व्यापार,कनिष्ठ नोकरी' आज मात्र उलट झाले आहे. आता म्हटले जाते 'उत्तम नोकरी,मध्यम व्यापार,कनिष्ठ शेती!

गेल्या अनेक वर्षापासुन शेतक.यांच्या आत्महत्या सुरू आहेत. विदर्भात आणि त्याही पश्चिम विदर्भात त्या मोठया संख्येने होत आहेत. ही फार दु:खाची आणि शरमेची बाब आहे. शेतकरी आत्महत्या का करतात? या कारणाचा शोध घेणे गरजेचे आहे. या समस्येवर उपाय म्हणुन शासनाने विदर्भासाठी पॅकेज जाहीर केले तरीही आत्महत्या सुरूच आहेत. याचा अर्थ, या पॅकेजच्या पलीकडे शेतक–याचे दु:ख आहे. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन गणली जाते. भारतातील एकुण लोकसंख्येपैकी ७६ टक्के लोकसंख्या ही कृषी आणि कृषी आधारीत उद्योगातील अवलबुंन आहे, देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये केवळ एकटया कृषीक्षेत्राच्या आपले पारंपारिक स्वरूप सोडुन आधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे. जागतीकीकरण,खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या काळात राज्यानी बाजारीकरणाचे धोरण स्विकारलेले आहे. त्यासाठी शेतकरीही प्रयत्नशील झाला आहे. शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा ''आत्मा'' आहे.

देशभरात एकसमान करप्रणाली असावी या उददेशाने भारतात १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर कायदा लागू करण्यात आला आणि परत शेतक.यावर उपासमारीची वेळ या सरकारनी आणली. आजही जे हाल शेतक.याना सोसावे लागत आहेत त्याचे परिणाम मात्र सपुर्ण भारतीय अर्थव्यवस्थेला भोगावे लागत आहे.

**प्रस्तावना :**

जगाात सर्वप्रथम कॅनडा या देशाने सन १९०५ मध्ये प्रायोगिक तत्वावर जीएसटी आकारण्याचा प्रयत्न केला. परंतु ख.या अर्थाने कॅनडामध्ये जीएसटीची प्रत्यक्ष अंमलबजावणी १९९१ नंतरच झाली. मात्र त्यापूर्वी सन १९५४ मध्ये फ्रॉन्स या देशात जीएसटीची अंमलबजावणी करण्यात आली. जगात सध्या १६० देशांनी जीएसटीची अंमलबजावणी केलेली आहे. भारतामध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली सन २००६ मध्ये संयुक्त आघाडी सरकारने बहूमताची स्थिती असतानाही २०१० पर्यत ते शक्य झाले नाही.नंतर २०११ मध्ये ११५ वी घटना दुरूस्ती विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. परंतु ते पास करून घेण्यात यश आले नाही. पुन्हा २०१४ मध्ये त्याच अनुषंगाने १२२ व्या घटना दुरूस्तीचे विधेयकही लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आले व सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सर्व अडथळयावर मात करून ३ ऑगस्ट, २०१६ ला राज्यसभेत व ८ ऑगस्ट,२०१६ ला लोकसभेत घटना दुरूस्ती विधेयक पास केले. त्यानंतर ८ संप्टेबर,२०१६ रोजी १०१वी घटना दुरूती कायदा २०१६ अधिसुचित करण्यात आला. या कायदयातील २७९ व्या कलमानुसार जीएसटी परिषदेची स्थापना करण्यात आली असून वस्तु व सेवा कर मसूदयाचा आराखडा १९८ पानी आहे. केंद्रीय अर्थमंत्रयाच्या अध्यक्षेतेखाली असलेल्या या समितीमध्ये केंद्रीय अर्थ राज्यमंत्री,प्रत्येक राज्याचे अर्थमंत्री हे सदस्य आहेत. स्वातंत्रोतर काळातील सर्वात मोठी कर सुधारणा म्हणून ओळखली जाणारी वस्तू व सेवा कर करप्रणाली १ जुलै, २०१७ पासून अंमलात आलेली असून यामध्ये एकूण १२०० वस्तू व ५०० सेवा समाविष्ट केलेल्या आहेत.

**गृहितक :**

वस्तू व सेवा कर,शेतमालविषयक किंमत धोरण, शेतक. याच्या समस्या

**वस्तू व सेवा कर :**

वस्तू व सेवा कर हा एक अप्रत्यक्ष कर कायदा आहे. या कर कायदयाअंतर्गत एक देश एक कर लागू करण्यात आला आहे. म्हणजेच देशभरात एक वस्तूवर समान कर आकारण्यात आला आहे. यामूळे एखादी वस्तू व सेवा कोणत्याही राज्यातून समान किंमतीला प्राप्त होईल. जीएसटी हा नवीन कर कायदा जम्मू काश्मीर वगळता

देशाच्या सर्व राज्यात व केद्रंशासित प्रदेशात लागू करण्यात आला आहे. जीएसटीमुळे केंद्र सरकारचे असलेले अप्रत्यक्ष कर उदा. केद्रींय उत्पादन शुल्क, अतिरीक्त उत्पादन शुल्क,विशेष उत्पादन शुल्क ,विशिष्ट औषधी व स्वच्छता वस्तू उत्पादन शुल्क,सेवा कर, अतिरीक्त संतुलन व शुल्क,विशेष अतिरीक्त आयात कर व अधिभार उपकर इत्यादी राज्य सरकारचे राज्य विक्री कर, मनोरंजन कर, जाहीरातीवरील कर,लाटरी,सटटा जुगार यावरील कर,केद्रींय विक्रीकर हे सर्व अप्रत्यक्ष कर कायदे रदद करण्यात आले आहे.यात केद्र सरकारचे ८ कर व राज्य सरकारचे ९ कर रदद करून वस्तू व सेवा कर जीएसटी कायदा लागू करण्यात आला आहे.

**GST चा शेतकरी वर्गावर होणारा परिणाम :**

सध्या जागतिक आर्थिक अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमिवर सरकार आणि बाजारपेठ यांचे परस्परसंबंध कसे असावे जेनेकरून बाजार अपयशी होणार नाही. बाजार यत्रणा सरकार हे एकमेकाना पर्यायी आहेत की पूरक कल्याणकारी अर्थव्यवस्था कशी आणता येईल, भाववाढ रोखण्यासाठी उपाय, रोजगार वाढीसाठी सुरू असलेली जगभरातील चर्चा इत्यादीवर उपाय आवश्यक आहे. सरकारने लोकांच्या आर्थिक शोसन होण्यापासून संरक्षण करावे हा विचार आवश्कयक आहे . त्यासाठी महत्वाचे उदयोग हे सरकारी नियंत्रणात असावे आणि ते सरकारनेच चालवावे अशी भूमिका महत्वाची आहे. तरीपण सरकारनी जीएसटी सारखे कर शेतक.यावर लावून शेतकरी वर्गाचे नुकसान केले. त्याचा परिणाम खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

१. जीएसटी मुळे शेतक.याना शेती करणे परवडत नाही. कारण शेती करणे शेतक.याना महाग झालेली आहे.

२. शेतक.याना सुरूवातीपेक्षा जीएसटी लागु झाल्यापासून जास्त खर्च करावा लागत आहे.

३. जीएसटी मुळे शेतक.याना मिळणारा नफा कमी झाला आहे.

४. शेतक.याना शेतीसाठी लागणारी अवजारे टॅक्टर,मशीन,टायर,यंत्रे,महाग झाली आहेत.

५. कीटकनाशक यावरती १८ टक्के टॅक्स शेतक.याना दयावा लागत आहे.

**कोणत्या वस्तुवर कीती टक्के टॅक्स :**

| वस्तु | दर | झालेला परिणाम |
|---|---|---|
| उत्पादन | १२ टक्के | शेतीवर मालाला नुकसान |
| कीटकनाशक | १८ टक्के | कीटकनाशक महाग |
| टॅक्टर | १२ टक्के | टॅक्टर आणि उपकरणे महाग |
| रबर | २८ टक्के | टायर महाग |
| प्लास्टिक पाइप | २८ टक्के | प्लास्टिक पाइप महाग,टयूबवैल महाग |

**शेतमालविषयक किंमत धोरणाची आवश्यकता :**

सरकारचे बाजारयंत्रणेवर नियंत्रण नसेल तर शेतमालाच्या किंमतीत अवास्तव चढउतार होतात. या चढउताराचा ग्राहक आणि शतकरी अशा दोन्ही वर्गावर विपरीत परिणाम होतो. शेती व्यवसायाच्या विकासाला असे चढउतार मारक ठरतात. एखादया वर्षी भरपुर पिक झाले आणि तो संपुर्ण माला बाजारात विक्रीसाठी आला तर पुरवठा जास्त आणि मागणी कमी अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतमालाच्या किंमतीत प्रचंड घसरण होते. म्हणुन भरपुर पिक होऊनही शेतक.यांना योग्य किंमत मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होत नाही. याउलट एखादया वर्षी चांगले पिक झाले नाहीतर बाजारातील शेतमालाच्या पुरवठा कमी होतो. त्यामुळे शेतमालाच्या किंमतीत प्रचड वाढ होते. परंतु लहान शेतकयाना जवळील विक्री योग्य माल कमी असल्यामुळे त्यांना या किंमत वाढीचा फायदा मिळत नाही. शेतमालाच्या किंमती वाढल्याने गरीब वर्गातील ग्राहकांच्या उपभोगावर देखील प्रतिकुल परिणाम होतो. म्हणुन शेतक.यांना योग्य मोबदला मिळवुन देणारी आणि त्यांना प्रेरणा देणारी शेतमालाची किंमत निश्चित करणे आवश्यक असते. तसेच किंमतीतील अनावश्यक चढउतार टाळुन शेतक.याच्या हिताची काळजी घेणे आवश्यक असते. योग्य किंमतीतर शेतमालाच्या पुरवठा करून गरीब वर्गातील ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे देखील तेवढेच महत्वाचे असते. या सर्व कारणामुळे शेतमालविषयक किंमत धोरण निश्चित करण्याची आवश्यकता निर्माण होते

**जागतिकीकरणात शेतक.याच्या समस्या :**

जागतिकीकरणाने खुली बाजारपेठेत खुली स्पर्धा निर्माण केली आहे. कारण खल्या स्पर्धेखेरीज गुणवत्ता,उत्पादकता वाढत नाही,प्रगती होत नाही,असा सिध्दांत जागतीकीकरणामुळे निर्माण झाला. परंतु स्पर्धा कोणी,कोणाबरोबर करायची,कोठे करायची,याचे मात्र कोणतेही निकष सांगितलेले नाहीत.स्पर्धा असावी,पण ती

बरोबरीच्या पैलवानाशी असावी,परंतु येथे भारतीय शेती आणि अमेरिकन किंवा जपानी शेती यांच्यात स्पर्धा लावली आहे. या प्रगत भाडंवली देशातील शेतीवर त्या देशातील १० टक्के लोकसंख्या अवलबुन आहे. भारतासारख्या देशात ७०टक्के लोकसंख्या शेतीवर अवलबुंन आहे. प्रगत देशात अल्पभुधारक शेतक.याचयाकडे शेकडो एकर जमीन आहे. प्रगत देशात अब्जावधी डॉलर्सची सबसिडी दिली जाते. तेथील शेतकरी प्रचंड प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करतात. शेतीमध्ये यंत्रे वापरले जातात तेथे राज्य शासन शेतीला प्राधान्य देऊन योजना तयार करते. अशा शेतीशी भारताच्या शेताची खूली स्पर्धा लावली तर या स्पर्धेचे रूपांतर मक्तेदारीत होईल मोठा शेतकरी छोटया शेतकयाना खाऊन टाकणार आहे. म्हणुन छोटया शेतकयासांठी अल्पभुधारकासाठी भारत सरकारला शेतकयाला भव्य स्वप्नात ठेवत आहे स्वत झोपेचे सोंग करीत आहे.त्यासाठी छोटया अल्पभुधारक शेतकयानी एकत्र येऊन सरकारला प्रंचड हादरा दिला पाहीजे तरच ही समस्या सुटु शकेल.

**शेतकरी नेतुत्वाची समस्या:**

१. भारतामध्ये प्रदेशिकता,जात,वंश,भाषा,धर्म,लिंग,सीमा प्रश्न अशा प्रश्नाच्या आधारे नेतृत्वाची निर्मीती आणि विकास झालेला आहे परतु भारतातील ७०टक्के लोकाचे भवितव्य प्रत्यक्षपणे शेतीसी जोडलेले असतानाही शेती प्रश्नावर प्रभावी नेतृत्व निर्माण झाले. ते खा,ऊ.जा. या अर्थनितीच्या काळात अपयशी ठरले आहे.

२. या नव्या अर्थनितीमुळे शेती आणि एकुण भांडवलनिर्मीती यामध्ये शेती क्षेत्राच्या वाटप दिवसेदितस घसरत आहे. शेती उत्पादन क्षमता सुध्दा घसतरत आहे.

३. शेतकरी नेतृत्व हे कोणत्या तरी राजकीय पक्षाकडे आकर्षित होत आहे. म्हणुन भारतीय शेतीत देशी आणि परदेशी कपन्या येत आहेत. शेतकरी उध्वस्त होत आहे. शेतकरी शेतीचे स्वामीत्व गमावुन बसत आहेत. शेतकरी आत्मह करीत आहेत. आत्महत्याची प्रक्रीया गतीमान होत आहे. नववसाहतवाद निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत मात्र शेतकरी नेते आणि राज्य हे भांडवलदारांचे दुयम भागीदार होण्यात मश्गुल आहेत.

म्हणुन राज्यानी आपली धोरणे बदलली पाहिजे. शेतक. यानी नेत्यावर आणी राज्यानी भुमीपुत्रावर आणि शेतीकरी अधिका.यावर विसबुंन न राहता काही ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे.

**निष्कर्ष :**

एकीकडे शेतकरी शेतीकर्जाने दुष्काळाने हैराण झाले तर दुस—या बाजूने आपल्या देशातील मंदिरामध्ये पैसाचा महापूर आलेला आहे. या भारतामध्ये साधारणपणे ५ लाख ७५ हजार मोठी मंदिरे आहेत तर ६ लाखाच्या जवळपास लहान मंदिरे आहेत. या सर्व मंदिराचे एकूण वार्षिक उत्पन्न १३ लाख कोटी रूपये इतके आहे. ही सर्व रूपये जर शेतक—याच्या शेतीसाठी जर वापरली तर जमीन, संपत्ती वितरणामध्ये फार मोठी विषमता दिसून येणार नाही व गरिबी कमी होण्यास मदत होईल आणि जीएसटी सारखे कर लावण्याची सरकारला गरजही पडणार नाही. जर या दुरदृष्टीचा देशाच्या विकासासाठी उपयोग केला तर भारत श्रीमंताच्या यादीत प्रथम क्रमाकावर येईल.

**संदर्भ :**

भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन, डॉ. विजय कवीमडंण

भारतीय अर्थशास्त्र, डॉ. प्रभाकर देशमुख

योजना मासिक

अर्थसंवाद—२०१७, जुलै — ऑगस्ट — सप्टेबर, खंड .२

दैनिक लोकसत्ता